




दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २०८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.११ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# युद्धाचा भडका, महाराष्ट्रात व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, नागपूर :** आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या इराण-इस्रायल संघर्षाचे पडसाद आता स्थानिक पातळीवरही उमटू लागले आहेत. या युद्धामुळे जागतिक ऊर्जा बाजारपेठेवर परिणाम होत असून त्याचा थेट परिणाम एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर होत असल्याचे दिसून येत आहे. नागपूरसह राज्यात व्यावसायिक गॅस सिलेंडरचा तुटवडा निर्माण झाल्याने हॉटेल, धाबे आणि खाद्यपदार्थ व्यवसायिकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. गॅस एजन्सीकडून पुरेशा प्रमाणात सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे अनेक व्यावसायिकांना आता पर्यायी व्यवस्थेकडे वळण्याची वेळ आली आहे.

मागील काही दिवसांपासून व्यावसायिकांना मिळणाऱ्या गॅस सिलेंडरच्या संख्येत मोठी घट झाली आहे. व्यवसायिकांच्या माहितीनुसार, यापूर्वी दररोज सुमारे दहा व्यावसायिक सिलेंडर मिळत होते. मात्र सध्या ही संख्या अचानक घटून केवळ दोन ते तीन सिलेंडरवर आली आहे. त्यामुळे रोजच्या स्वयंपाकासाठी लागणारा गॅस अपुरा पडत आहे.

त्यामुळे हॉटेल आणि धाबा चालकांना कामकाज सांभाळणे कठीण होत आहे. अनेक हॉटेल मालकांनी याबाबत गॅस एजन्सीकडे विचारणा केली असता, सध्या स्टॉक मर्यादित असल्याने कमी प्रमाणात सिलेंडर दिले जात असल्याचे सांगण्यात आले आहे. पुरवठा सुरळीत झाल्यानंतरच सिलेंडरची संख्या वाढवता येईल, असेही एजन्सीकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

नागपूर शहरात दररोज मोठ्या प्रमाणात ग्राहक हॉटेल आणि धाब्यांमध्ये जेवणासाठी येतात. मात्र गॅसचा पुरवठा कमी झाल्यामुळे स्वयंपाकाची प्रक्रिया मंदावली आहे. कमी सिलेंडरमध्ये जास्त ग्राहकांना सेवा देणे कठीण होत असल्याचे अनेक व्यावसायिकांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर काही हॉटेल आणि धाबा चालकांनी पर्यायी उपाययोजना सुरू केल्या आहेत. गॅस सिलेंडर उपलब्ध झाले नाहीत तर लाकडाच्या चुलीवर स्वयंपाक करण्याची तयारी करण्यात आली आहे. काही ठिकाणी लाकडाचा साठाही करून ठेवण्यात आला आहे. याशिवाय इलेक्ट्रिक स्टोव्ह, इंडक्शन आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या मदतीने स्वयंपाक करण्याचाही विचार केला जात आहे.





हॉटेल चालकाने सांगितले की, गॅस मिळाला तर उत्तमच; मात्र पुरवठा थांबला तर ग्राहकांना सेवा देणे थांबवता येणार नाही. त्यामुळे आम्ही आधीच लाकूड आणि इलेक्ट्रिक उपकरणांचा पर्याय तयार ठेवला आहे. गॅसचा पुरवठा दीर्घकाळ नियमित झाला नाही तर त्याचा आर्थिक परिणामही होऊ शकतो. लाकूड किंवा इलेक्ट्रिक साधनांवर स्वयंपाक करणे अधिक वेळखाऊ आणि खर्चिक ठरू शकते. त्यामुळे उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असून त्याचा परिणाम खाद्यपदार्थांच्या दरांवरही होऊ शकतो.

दरम्यान, गॅस पुरवठा लवकरात लवकर सुरळीत व्हावा, अशी अपेक्षा हॉटेल आणि धाबा चालकांकडून व्यक्त केली जात आहे. अन्यथा नागपूरातील अनेक लहान-मोठ्या खाद्य व्यवसायांवर त्याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**● नाशिक शहरात देखील कमर्शियल सिलेंडरचा तुटवडा, अनेक हॉटेलमध्ये २ दिवसांचा गॅस साठा शिल्लक**

नाशिकमध्ये सुद्धा हॉटेल व्यावसायिकांवर हॉटेल बंद करण्याची वेळ आली आहे. सध्या परिस्थितीला नाशिकच्या एका हॉटेलमध्ये दिवसाला दोन ते तीन गॅस सिलेंडर लागतात. मात्र कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा होऊ शकत नसल्याने केवळ दोन-तीन दिवस पुरेल इतका साठा आता शिल्लक राहिला आहे. त्यानंतर हा साठा उपलब्ध होने कठीण झाल्याने, हॉटेल व्यवसाय बंद करण्याची वेळ आता हॉटेल व्यवसायिकांवर आलेली आहे. त्यामुळे हॉटेल व्यावसायिकांना गॅस सिलेंडरचा पुरवठा ही एक मोठी समस्या निर्माण झाली आहे. या संपूर्ण विषयावर आता सरकार आणि प्रशासन काय तोडगा काढते? हे बघणे महत्त्वाचे असणार आहे.

गेल्या शनिवार-रविवार पासून गॅस सिलेंडर तुटवड्याची समस्या निर्माण झाली आहे. गॅस सिलेंडर पुरवठाबाबत आम्ही विक्रेता यांच्याशी संपर्क साधत आहे. परंतु कमर्शियल गॅस सिलेंडर द्यायचा नाही, असे उत्तर दिले जात आहे. परिणामी आम्ही हॉटेल मेन्यू हा संकुचित केला आहे, अशी प्रतिक्रिया हॉटेल व्यावसायिक रितेश पाटील यांनी दिली.

**● छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन दिवसांचाच औद्योगिक गॅसचा साठा**

आखातातील युद्ध परिस्थितीमुळे औद्योगिक नगरी छत्रपती संभाजीनगरमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दोन दिवस पुरेल एवढाचा औद्योगिक गॅसचा साठा उपलब्ध असल्याची माहिती आहे. त्यामुळे वाहन उद्योगातील काही उद्योग बंद पडले आहेत. हे संकट करोनापेक्षाही भयानक असू शकेल, अशी भीती उद्योजकांनी व्यक्त केली आहे. पुढील दोन दिवसांत एलएनजी, एलपीजी, मिथेनॉल आणि पिचिंग ऑईल याचा पुरवठा सुरळीत झाला नाही तर वाहन उद्योगासह औषधी निर्मिती उद्योग बंद पडण्याची भीती आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील उद्योगांना सर्वसाधारणपणे २४० मेट्रिक टन गॅस पुरवठा लागतो. आखातातील युद्ध परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर आता परिणाम जाणवू लागला आहे. सूक्ष्म, मध्यम, लघु उद्योगांतील दहा कंपन्यांचे काम मंगळवारी थांबल्याचे सूत्रांनी सांगितले. जर गॅसपुरवठा सुरळीत झाला नाही तर कंपन्या त्यावर अवलंबून असलेल्या सर्व घटकांच्या जीवनावर परिणाम होण्याची भीती वर्तविली जात आहे.

परिस्थितीवर चाचपणी करण्यासाठी चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज अँड अ‍ॅग्रीकल्चर (सीएमआयए) च्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. बैठकीत अनेक उद्योजकांनी दोन दिवसांचा इंधनसाठा शिल्लक असल्याचे सांगितले. ऑरिक ग्रीन कंपनीचे गोसर यांनी सांगितले, की आम्हाला रोज ३२ ते ३५ मेट्रिक टन गॅस लागतो. तो आता मिळणार नाही, असे सांगण्यात येत आहे. पुढचे चार-पाच दिवस कामकाज कसेबसे चालेल. त्यानंतर कंपनी बंद केल्याशिवाय पर्याय नाही. आमच्याकडे २५० कंत्राटी काम करतात. त्यांचीही अडचण होणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये छोटे मोठे साडेचार हजार उद्योग आहेत. त्यातील ९० टक्क्यांहून अधिक उद्योगांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे. दोन,तीन दिवस पुरेल एवढाच इंधनसाठा असल्याने उद्योगांसमोर संकट आहे. जर परिस्थिती सुधारली नाही तर मोठे नुकसान होईल, अशी प्रतिक्रिया सीएमआयएचे अध्यक्ष उत्सव माच्छर यांनी दिली.

**● कोल्हापूरात गॅस सिलेंडरसाठी रांगा; मात्र घाबरुन न जाण्याचे पुरवठा अधिकाऱ्यांचे आवाहन**

सध्या गॅस सिलेंडर बुकिंग कालावधी २१ वरून आता २५ दिवसांवर करण्यात आला आहे. त्यातच गॅस सिलिंडरची किंमतही ६० रुपयांनी वाढवण्यात आली आहे. तर युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुढच्या काळात गॅस मिळेल की नाही? याबाबत संभ्रमावस्था असल्यामुळेच गॅस सिलेंडर घेण्यासाठी नागरिकांच्या कोल्हापुरात ठिकठिकाणी रांगा लागल्या आहेत. काही जणांचे गॅस सिलिंडरसाठी बुकिंग झाले आहे. त्यामुळे रांगा लावून सिलिंडर घेत आहेत. यावेळी काही ठिकाणी वितरकांशी वादाचे प्रसंग देखील उद्भवत आहेत. मात्र यावर बोलताना जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांनी युद्धाच्या पार्श्वभूमीवर साठेबाजी रोखण्यासाठी नागरिकांना आवाहन केलं आहे. जिल्ह्यात गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा आहे, त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. गरज असल्यासच गॅस सिलिंडर बुकिंग करावे. व्यावसायिक गॅसवर तात्पुरते निर्बंध आणले आहेत, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांनी दिली.

## ग्रामपंचायतीचे स्वच्छतेकडे दुर्लक्ष; कोंडलेल्या नाल्यांमुळे दुर्गंधी

### नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर !

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१०, राहुरी :** राहुरी खुर्द ग्राम पंचायत कार्यालयाकडून स्वच्छतेकडे होत असलेल्या दुर्लक्षामुळे गावातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील अनेक भागांमध्ये सांडपाण्याच्या नाल्या कोंडल्या गेल्याने सांडपाणी वाहून न जाता रस्त्यावर साचत असून परिसरात दुर्गंधी पसरत आहे. यामुळे नागरिकांना विविध आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागत असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

गावातील काही ठिकाणी नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घाण साचून राहिली आहे. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा न होता ते रस्त्यावर व घरांच्या आसपास साचत असल्याचे चित्र दिसून येत आहे. परिणामी डास, माशा व इतर कीटकांची वाढ होत असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

याशिवाय सांडपाण्याच्या नाल्या कोंडल्यामुळे काही ठिकाणी नागरिकांकडून घरातील खरकटे व उरलेले अन्न रस्त्यावर टाकत असल्याचेही दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्यावर घाण साचून दुर्गंधी वाढत असून वाहन चालकांना वाहतूक करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना घसरून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचीही नागरिकांनी भीती व्यक्त केली आहे.



गावातील काही भागांमध्ये कचराकुंडीची योग्य व्यवस्था नसल्यामुळे कचरा उघड्यावर टाकला जात असून त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढत आहे. कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

ग्रामपंचायतीने नियमित स्वच्छता मोहीम राबवून नाल्यांची साफसफाई करणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांकडे वेळेवर लक्ष दिले नाही तर भविष्यात गंभीर आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही ग्रामस्थांनी सांगितले. दरम्यान, या समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नागरिकांकडून लवकरच ग्रामपंचायत कार्यालयाला निवेदन देण्याची तयारी सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. ग्राम पंचायत प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन सांडपाण्याच्या नाल्यांची साफसफाई करावी तसेच कचराकुंडीची योग्य व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

## भाविकांच्या सुविधांसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** शहरातील श्री महाकाली माता चैत्र नवरात्र यात्रा यंदा २४ मार्चपासून सुरू होत असून यात्रेच्या अनुषंगाने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आ. किशोर जोरगेवार यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसह महाकाली मंदिर परिसर आणि यात्रा मार्गाची पाहणी केली. यात्रेदरम्यान, राज्यभरातून येणाऱ्या भाविकांना सुरक्षित व सुसज्ज सुविधा मिळाव्यात, यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून काम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



यावेळी मनपा आयुक्त नरेश अकुनूरी, वेकोलीचे मुख्य महाप्रबंधक रेड्डी, मनपा उपायुक्त टाले, महावितरणचे उपविभागीय अधिकारी केळकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता पगारे, सहाय्यक अभियंता राठोड यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच प.पू. संत मनीषजी महाराज, बलराम डोडानी, अजय जयस्वाल, प्रकाश देवतळे, दशरथसिंह ठाकूर, श्याम धोपटे, रामजीवन परमार, बाबुपेठ मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे, नगरसेवक संजय कंचर्लावार, जितेश कुळमेथे, नितेश गवळे, भालचंद्र दानव, नगरसेविका ज्योती जीवने, सारिका संदूरकर, सतीश तायडे, धनराज जीवने, नगरसेविका वैशाली चंदनखेडे, संगीता अमृतकर, अजय जयस्वाल, संजय बुरघाटे, शैलेश केरझरकर, आशिष मासिकर आदींची उपस्थिती होती.

महाकाली यात्रा ही चंद्रपूर जिल्ह्यातील एक प्रमुख धार्मिक परंपरा मानली जाते. दरवर्षी या यात्रेसाठी राज्याच्या विविध भागांतून लाखोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. त्यामुळे यात्रेच्या काळात शहरात होणारी गर्दी लक्षात घेता भाविकांसाठी सर्व सोयीसुविधांची योग्य व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याचे आ. जोरगेवार यांनी यावेळी सांगितले. यावेळी पार्किंग व्यवस्था, यात्रा परिसराचा विस्तार, भाविकांसाठी निवासाची सोय, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, स्वच्छता व्यवस्था आणि वाहतूक नियंत्रण या महत्त्वाच्या बाबींवर अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली.

यात्रेदरम्यान कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये आणि भाविकांना सुरळीत दर्शन घेता यावे, यासाठी उत्तम नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उन्हाळ्याचा विचार करून मंदिर परिसर आणि यात्रा मार्गावर पुरेशा प्रमाणात शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ठेवावी, तसेच परिसरात स्वच्छता राखण्यासाठी नियमित साफसफाई आणि कचरा व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था करावी, असेही त्यांनी सांगितले.

**महाशिवलिंग येथील व्यवस्थेची पाहणी...**

राज्यातील सर्वात मोठ्या प्राचीन शिवलिंग स्थळावरही भक्तांची गर्दी वाढत आहे. यात्रेदरम्यान येथेही मोठ्या संख्येने भाविक येण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने येथे पेंडाल, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तात्पुरते शौचालय तसेच इतर आवश्यक सुविधा उभारण्याच्या सूचना आ. किशोर जोरगेवार यांनी दिल्या.

# हवी शंकानिवारणाची लस!

गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून महिलांचे संरक्षण व्हावे, यासाठी केंद्र सरकारच्या वतीने २८ फब्रुवारीपासून एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू करण्यात आली आहे. राजस्थानच्या अजमेर येथे पंतप्रधानांनी या लसीकरणाचे उद्घाटन केले. ही लस आपल्या मुलींना वयाच्या १४-१५व्या वर्षात देण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन त्यांनी देशातील पालकांना केले आहे. ही मोहीम इतर राज्यांत या वर्षीच्या महिला दिनापासून म्हणजेच ८ मार्चपासून राबवली जाईल. तूर्तास, हे लसीकरण ऐच्छिक आहे. आपल्या मुलीला लस द्यावी की नाही, हा सर्वस्वी पालकांचा निर्णय असेल. कारण त्यासाठी त्यांची संमती आवश्यक आहे. ही लस ९ ते ४५ वर्षांपर्यंतची मुले, पुरुष यांनाही दिली जाते.

या लसीकरण मोहिमेबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लसीच्या विश्वासार्हतेबाबत अनेक लोक शंका उपस्थित करीत आहेत. याविषयी थोडक्यात माहिती करून घेऊ या. एचपीव्ही विषाणू म्हणजे ह्युमन पॅपिलॉमा व्हायरसेस. येथे 'व्हायरसेस' म्हणायचे कारण म्हणजे, एचपीव्ही हा एक विषाणू नसून जवळपास २०० प्रकारच्या विषाणूंचा एक समूह आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्यामागे एचपीव्ही विषाणू सर्वाधिक कारणीभूत असतो. धूम्रपान, असुरक्षित शारीरिक संबंध हे देखील त्यास कारणीभूत ठरतात. गर्भाशय मुखाचा कर्करोग होण्यासाठी या २०० विषाणूंपैकी फक्त १०-१२ प्रकारचे एचपीव्ही विषाणू कारणीभूत असतात. यातील, १६, १८, ३१, ३३, ४५, ५२, ५८ या प्रकारच्या एचपीव्हीने गर्भाशय मुखाचा कर्करोग किंवा शरीरावर छोटे चामखीळ निर्माण होतात. एचपीव्ही विषाणूमुळे होणारा कर्करोग पुरुषांमध्येदेखील आढळतो. असुरक्षित शरीरसंबंधांतून हा विषाणू फैलावतो. गुदद्वार, शिश्न, तोंड, घसा यांचाही कर्करोग त्यामुळे उद्भवू शकतो. भारतात स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णसंख्येनंतर, दुसऱ्या क्रमांकावर गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे रुग्ण आढळतात.

हा कर्करोग न होण्यासाठी सर्वांत महत्त्वाचा प्रतिबंधात्मक उपाय म्हणजे, एचपीव्ही लस. या लशीने कर्करोगाविरुद्ध ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत संरक्षण मिळते, असे सांगितले जाते. दुसरे म्हणजे, गर्भाशय मुखाचे नियमित स्क्रीनिंग, तपासणी गरजेची आहे. या तपासणीत या कर्करोगाचे निदान लवकर होऊन तो टाळता येणे शक्य आहे, असे जागतिक आरोग्य संघटनेचे म्हणणे आहे. किमान दर तीन ते पाच वर्षांनी ही तपासणी न चुकता करून घेतली पाहिजे. परंतु, आपल्या भारतात, गर्भाशय मुखाची नियमित तपासणी करण्याचे प्रमाण जवळपास १.९ टक्के इतके अत्यल्प आहे.

सध्या जगभरात आणि भारतात, एचपीव्ही लस म्हणून गार्डासील -४, गार्डासील -९ आणि सर्व्हिरॅक्स या लशींचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. गार्डासील – ४ आणि सर्व्हिरॅक्स या लशी चार प्रकारच्या एचपीव्हीपासून संरक्षण करतात, तर, गार्डासील – ९ ही लस एचपीव्हीपैकी ६, ११, १६, १८, ३१, ३३, ४५, ५२, ५८ या एचपीव्हीपासून संरक्षण करते, असे सांगितले जाते.

भारतात २००९मध्ये बिल आणि मेलिंडा गेट्स यांच्याशी संलग्न असलेली 'पाथ' (झअढक) ही संस्था व इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च यांच्या सहाय्याने गुजरात आणि आंध्र प्रदेश येथील एकूण २४ हजार मुलींना ही लस देण्यात आली होती. त्यानंतर सात मुलींचा मृत्यू झाला. परंतु, या मुलींचा मृत्यू त्या लशींशी संबंधित नसून, मलेरिया, साप चावणे, पाण्यात बुडून आणि आत्महत्या इ. कारणांमुळे झाला होता, असे स्पष्टीकरण आयसीएमआरने दिले होते. मात्र, तज्ज्ञांनी आणि न्यायालयाने देखील, 'भारतीय जनता ही विदेशी लोकांसाठी प्रयोगाचे गिनिपीग साधन आहे,' असे म्हणत त्याबाबत आक्षेप घेतले होते. त्यामुळे केंद्र सरकारने हे लस परीक्षण तातडीने थांबवले होते. स्पेन, जपान या देशांनी देखील अशा लसीकरण परीक्षणात झालेल्या काही मृत्यूंमुळे हे लसीकरण थांबवले होते. हे मृत्यू लसीकरणाशी निगडित नसले तरीही जपानने अद्याप या लसीकरणास अधिकृत मान्यता दिलेली नाही.

आता, भारतात सुरू होत असलेल्या लसीकरणातील लस, ही देखील बिल गेट्स यांच्याशीच संबंधित 'गॅवी' (ऋअतख) संस्थेकडून सादर झालेली आहे. सन २००९मध्ये जी 'गार्डासील-४' लस दिली गेली होती, तीच आत्ताचीही आहे, असे सांगितले जाते. या लसींसंदर्भात संपूर्ण अभ्यास पुढे येत नसल्याचेही दिसत आहे. गर्भाशय मुखाचा कर्करोग हा प्रामुख्याने वयाच्या ३०-४५ वर्षांदरम्यान अधिक प्रमाणात आढळतो. क्वचितच देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांमध्ये हा थोडा अलीकडे २५-३० वर्षांमध्ये दिसू शकतो. या लशीला अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासनाकडून डिसेंबर २०१४मध्ये मान्यता देण्यात आली असून, याचे प्रात्यक्षिक हे २००६ पासून केले गेले होते. या लशींवरील संशोधनाचे निष्कर्ष हाती येण्यासाठी किमान ३० वर्षांचा परिणामात्मक कालावधी असायला हवा. परंतु, त्याआधीच लशीला मान्यता कुठल्या अभ्यासावरून दिली गेली, हे स्पष्ट होत नाही. त्याचबरोबर, याचे कार्य, दुष्परिणाम आणि दूरगामी परिणाम यांबाबत चक्कर येणे, इंजेक्शनच्या जागी सूज इ.लक्षणे सोडून अधिक स्पष्टता दिली गेली नाही. या लशीचे एक ते दोन डोस द्यावेत, असे जागतिक आरोग्य संघटना सांगते. प्रतिकारशक्ती कमी असणारे, एचआयव्हीबाधित व्यक्ती आणि अधिक वयाच्या व्यक्तींना त्या अनुषंगाने तीन वा अधिक डोस द्यावेत, असेही संघटना म्हणते. सरकारकडून सध्या मोफत दिल्या जात असलेल्या या लशीची किंमत ३९२७ रुपये आहे. तिचा पुढचा डोस कोणाला, कधी द्यायचा, तसेच पुढचा डोसही सरकार मोफत देणार आहे का, याही बाबतीत सरकारकडून स्पष्टता नाही. त्याचवेळी, अमेरिकेचे आरोग्यमंत्री रॉबर्ट एफ. केनेडी यांनी एचव्हीपी लसीकरणाला विरोध करत गार्डासील-४ लस घेतल्यानंतरचा मृत्यूदर कर्करोगापेक्षा ३७ टक्क्यांनी अधिक आहे, असा आक्षेप नोंदवला आहे. हा मुद्दा, एपस्टीन फाइल्समध्ये बिल गेट्स यांचे आलेले नाव, करोना संबंधीच्या लशींबाबतचे भारतीय नागरिकांचे आक्षेप आणि इतर अनेक बाबींमुळे लसीकरण सुरू होण्यापूर्वीच भारतात त्याबाबत साशंकता निर्माण होते आहे.

मुळात एचपीव्हीचे ९० टक्के संक्रमण हे आपले शरीर प्रतिकारशक्तीद्वारे परतून लावते. त्यातील काही एचपीव्ही संक्रमणाचाच धोका कर्करोगाशी संबंधित असतो. सुरक्षित शरीरसंबंध, अनेक व्यक्तींशी शरीर संबंध टाळणे, नियमित तपासणी या गोष्टींकडे लक्ष द्यायला हवे. नियमित तपासणी केल्यास कर्करोगाचा धोका अत्यंत कमी होतो. या तपासणीसाठी सध्या सरासरी १५०० ते तीन हजार रुपये लागतात. सरकारच्या विविध आरोग्य योजनांत या तपासण्या विनाशुल्क करून घेणे, जनजागृती यांतून देशातील गर्भाशय मुखाचा कर्करोग नक्कीच नियंत्रणात येईल.

**- डॉ. अंजली मुळके**

# व्हेनेझुएला, इराणनंतर क्युबा ?

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची दादागिरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अमेरिकेने तेलासाठ्यासाठी व्हेनेझुएला या छोट्याशा देशावर दादागिरी करून त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण करून त्यांना अटक केली आणि स्वतःला व्हेनेझुएला या देशाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर त्यांनी इराणमधील आंदोलनांना हवा देऊन तो देश अस्थिर करण्याचा डाव आखला त्यात त्यांना यश न मिळाल्याने त्यांनी इस्रायलला सोबत घेऊन इराणवर अमेरिका मोठा हल्ला केला आणि त्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खामेनी यांना ठार मारले. अमेरिकेच्या या दादागिरीला इराणने जशास तसे उत्तर दिल्याने मोठ्या युद्धाला तोंड फुटले. हे युद्ध अजूनही चालू असून या युद्धाची झळ संपूर्ण जगाला बसत आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी अमेरिका जगावर दादागिरी करत आहे.

अमेरिकेच्या या दादागिरीचा संपूर्ण जग निषेध करत असतानाच ट्रम्प यांची नजर क्युबा या छोट्याशा देशावर पडली आहे. व्हेनेझुएला आणि इराण नंतर कोण ? असा प्रश्न विचारला जात होता याचे उत्तर खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनीच दिले. ट्रम्प यांनी लॅटिन अमेरिकन नेत्यांच्या कार्यक्रमात बोलताना क्यूबातील कम्युनिस्ट सरकारला इशारा देत म्हटले आहे आहे की क्यूबाला स्वातंत्र्य मिळवून द्यायची वेळ आली आहे. क्यूबातील जनतेने स्वतःहून हे सरकार उलथवून लावावे अन्यथा अमेरिकेच्या कठोर कारवाईस सामोरे जावे. याचाच अर्थ अमेरिकेने जे इराणमध्ये केले तेच ते क्युबातही करतील. ट्रम्प यांच्या या इशाऱ्याचा क्यूबाच्या राष्ट्राध्यक्षांनी कठोर शब्दात निषेध केला असून अमेरिकेच्या संभाव्य आक्रमणाला तोंड देण्यासाठी आपली शस्त्र सज्जता वाढवली आहे. ट्रम्प यांनी असा इशारा केवळ क्युबालाच दिला आहे असे नाही काही दिवसांपूर्वी ग्रीनलँड या छोट्याशा देशालाही त्यांनी असाच इशारा दिला होता. ग्रीनलँडने स्वतःहून अमेरिकेत विलीन व्हावे आणि जर ग्रीनलँड स्वतःहून अमेरिकेत विलीन झाला नाही तर अमेरिका लष्करी बळ वापरून त्या देशाला अमेरिकेत विलीन करेल अशी धमकी ट्रम्प यांनी ग्रीनलँडला दिली होती. इतकेच नाही तर जे देश ग्रीनलँडचे समर्थन करतील त्या देशांवर अमेरिका जबर आयात शुल्क अर्थात टेरिफ लावेल असा सज्जड दम देऊन त्यांना ब्लॅकमेल केले. ग्रीनलँडला समर्थन देणाऱ्या युरोपीय देशांना केलेले हे ब्लॅकमेलच आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या ब्लॅकमेली विरुद्ध युरोपात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. ट्रम्प यांच्या या दादागिरी विरुद्ध डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन आणि इतर शहरात हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आणि ग्रीनलँड हा विकाऊ देश नाही अशा घोषणा दिल्या. इंग्लंड, फ्रान्स या देशांनी देखील ट्रम्प यांच्या या धोरणावर टीका केली असून डोनाल्ड ट्रम्प यांनी ही दादागिरी थांबवावी असे निवेदन दिले. केवळ युरोपच नव्हे तर संपूर्ण जग अमेरिकेच्या दादागिरी विरुद्ध एकजूट होत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिका खंडातही खदखद आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या



विस्तारवादी धोरणाविरुद्ध दक्षिण अमेरिका खंडातील देशातही मोठी नाराजी आहे. आज या देशांनी जाहीरपणे तसे बोलून दाखवले नसले तरी ते ही डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर नाराज आहेत. अमेरिकेतील नागरिकांनाही ट्रम्प यांचे हे विस्तारवादी धोरण मान्य नाही पण ट्रम्प आपली हेकेखोरी सोडायला तयार नाही. काहीही करून आपल्या शेजारी असलेल्या लहान देशांना अमेरिकेत विलीन करून घ्यायचे, तेल संपन्न राष्ट्रांवर ताबा मिळवून तेथील तेलासाठे ताब्यात घ्यायचे तसेच जे देश आपले ऐकणार नाही त्यांच्यावर जबर आयात शुल्क अर्थात टेरीफ लावून त्यांना ब्लॅकमेल करायचे आणि संपूर्ण जगावर आपली एकहाती हुकूमत गाजवायची हे ट्रम्प यांचे धोरण आहे आणि ट्रम्प यांचे हेच विस्तारवादी धोरण जगाला युद्धाच्या खाईत घेऊन जात आहे. अर्थात हे आताच सुरू आहे असे नाही तर अमेरिका महासत्ता बनल्यापासूनच हा देश आंतरराष्ट्रीय नियम व कायदे पायदळी तुडवून इतर देशांमध्ये हस्तक्षेप करीत आलेला आहे. अमेरिकेने वेगवेगळी कारणे आणि सबबी पुढे करून इतर देशांवर युद्ध लादलेली आहेत. त्याची फार मोठी किंमत या देशांना आणि जगाला चुकती करावी लागली. खुद्द अमेरिकेलाही या युद्धाचे मोठे परिणाम सहन करावे लागले होते. व्हिएतनाम, अफगाणिस्तान, इराक युद्ध छेडून, त्यावर लाखो करोडो डॉलरचा चुराडा करून अमेरिकेने काय मिळवले असा प्रश्न अमेरिकेतही विचारला जात आहे. मात्र अमेरिकेने त्या काळात युद्ध सुरू करण्यामागील आपला स्वार्थ लपविण्यासाठी वेगवेगळ्या सबबी पुढे केल्या पण ट्रम्प मात्र आपण सुरू करीत असलेल्या युद्धा मागचा स्वार्थ लपवून ठेवण्याचेही सौजन्य दाखवायला तयार नाहीत.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## नाना कळा

महा सत्ताक असूया
अंगात रे नानाकळा
विवाद दोघातिघांचा
जगत् सोसते कळा

साठवली अणूशक्ती
मार्गकरावा मोकळा
परिक्षा घे ताकदीची
प्रदर्शन करा सकळा

धुसफूस पडे बहिस्थ
अंदाज येवू द्या बळा
खानदानउध्वस्त करे
नादान खेळांत बाळा

खुम खुमी दाखवाया
अहंकार नसे रे बुळा
डोळ वटारालं किती
फोडू टाकशी बुबुळा

प्रगत आहो का खरे
काळापडला रे फळा
उच्चशिक्षीत अडाणी
रिकामेडोके आफळा

एकांतात बाभावला
स्वता कापे चळचळा
काळाशी स्पर्धा करी
होऊन जाई पाचोळा

एआय राक्षसी बनते
माणूस रे खुळ खुळा
गगनचुंबीनावाखाली
पाया हा खिळखिळा

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# बुद्धिबळातील चतुरंग रियाश चौगुले अंतिम विजेता !!

बुद्धिबळ (Chess) हा दोन खेळाडूंमध्ये ६४ घरांच्या १६ काळी व १६ पांढरी पटावर खेळला जाणारा एक अत्यंत लोकप्रिय जागतिक बौद्धिक बैठा खेळ.

यात प्रत्येक खेळाडूकडे १६ सोंगट्या असतात आणि अंतिम ध्येय प्रतिस्पर्ध्याच्या राजाला 'चेकमेट'करणं विरोधी राजाला अशा प्रकारे कोंडीत पकडणे की, त्याच्या सुटकेचा कोणताही मार्ग नसेल..असच आपल्या बुद्धीच्या बळावर डिवाइन पॅराडाईज हायस्कूल कल्याण चिंचपाडा पूर्व चा विध्यार्थी कु. रियाश चौगुले ने समोरच्या राजाला चितपट करत इंटरस्कूल चेस टूर्नामेंटमध्ये रियाश अंतिम विजेता ठरला.

इंटर स्कूल बुद्धिबळ स्पर्धा ठाणे जिल्ह्यातील कल्याण-डोंबिवली मधील ३० शाळांनी भाग नोंदविला होता त्यामध्ये डिवाइंड पॅराडाईज हायस्कूलचे अकरा विद्यार्थी सहभाग झाले इयत्ता पहिली ते दुसरी स्पर्धेमध्ये संविधान गोरखनाथ केदारे तिसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरला तसेच इयत्ता पाचवी ते सहावी स्पर्धेमध्ये डिवाईन पॅराडाईज हायस्कूल चिंचपाडा कल्याण शाळेचा विद्यार्थी रियाज शिवाजी चौगुले याने प्रथम क्रमांक मिळवून अंतिम विजेता ठरला. तसेच पिया नारायण नायर हिने तिसरा क्रमांक पटकावला तसेच इयत्ता सातवी ते आठवी स्पर्धेमध्ये समयका गोरखनाथ केदारे हिने तिसरा क्रमांक पटकावला ह्या स्पर्धेचे सर्वश्रेय डिवाइन पॅराडाईज हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेश कुमार शर्मा सर,दत्ता पंची सर तसेच सर्व शिक्षक वर्ग यांना जाते ही स्पर्धा वेदांता



इंटरनॅशनल स्कूल कल्याण पूर्व शंभर फुटी रोड येथे पार पडली.

**मनोगत :**

...ही स्पर्धा जिंकण्यासाठी मला माझ्या आई-वडिलांच्या आशीर्वाद तसेच मी शिकत असलेली शाळा डिवाईन पॅराडाईज हायस्कूलचे मुख्याध्यापक राजेशकुमार शर्मा सर, दत्ता पंची सर तसेच शाळेतील वर्गशिक्षिका सर्व स्टाफ यांच्या सर्व आशीर्वादाने व माझ्या जिद्दीच्या जोरावर हे सर्व शक्य झाले. मी इतक्यावरच न थांबता मला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये अनेक स्पर्धेना गवसणी घालून भारावून न जाता माझ्या आई-वडिलांचे माझ्या शाळेचे तसेच महाराष्ट्र राज्याचे नावलौकिक करायचा आहे.

**– कु.रियाश शिवाजी चौगुले.**
**बुद्धिबळ विजेता.(विद्यार्थी )**

# अमेरिकेच्या ट्रम्पनी जगाला युद्धाच्या खाईत लोटले !



आज अमेरिका – इस्त्रायल विरुद्ध इराण असे युद्ध गेली सुमारे दहा दिवस चालू आहे. हे युद्ध आणखी किती दिवस चालू राहणार हे आजतरी सांगता येणे अवधड आहे. या युद्धामुळे अनेक देशात भीती निर्माण झाली आहे. इराण मधील तणावामुळे जगभरात सुमारे १२ हजार हुन अधिक उड्डाणे रद्द झाली आहेत. अनेक ठिकाणी विमानतळाचे नुकसान झाले आहे. इराणच्या सामुद्रधुनीतून वाहने जाऊ शकत नसल्यामुळे अनेक ठिकाणी गॅस चा तुटवडा प्रचंड प्रमाणात सुरु झाला आहे. हॉटेल्स मधील गॅस पुरवठ्यावर याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर झाला आहे. ठिकठिकाणच्या लघु उधोगाचे गॅस अभावी मोठे नुकसान झाले आहे. हे युद्ध आत्तापर्यंत अमेरिका इस्त्रायल व इराण व काही इतर राष्ट्रे यांच्या पुरते मर्यादित होते. पण आता त्याची व्याप्ती जगाच्या बहुतेक भागात पोहचली आहे. विशेष गमतीची गोष्ट अशी कि हे युद्ध जगभरात पोहचले असताना संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीची अजून बैठक नाही हे आश्चर्याची घटना आहे. रशियाने ही बैठक त्वरित बोलाविण्याची मागणी केली आहे असे वाचण्यात आले. या युद्धामुळे सर्वच पदार्थ महागणार असून लोकांना जगणे अवधड झाले आहे. इराणमध्ये अनेक ठिकाणी जाळपोळ धूर यांचे साम्राज्य आहे. त्यामुळे तेथे लोकांचे आरोग्य धोक्यात आहे. शाळा महाविद्यालये बंद आहेत. इराण काही राष्ट्रावर हल्ले करत असल्यामुळे तेथेही परिस्थिती अवधड झाली आहे.

महायुद्धातील नुकसानीमुळे जागतिक पातळीवर संयुक्त राष्ट्रसंघ उभा राहिला पण आज त्याला जगातील मोठी राष्ट्रेच विचारात नाहीत ही वस्तुस्थिती अशी. अशा परिस्थितीत जगात शांतता कशी नांदणार? हा मोठा प्रश्न आहे. आज तरी अमेरिकेच्या ट्रम्प यांनी जगाला खाईत लोटले आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## महिला बाईक रॅलीने पोंभुर्णा नगरी दुमदूमली



**अक्षराज : अरुण कुतरमारे**

**दि.१०, पोंभुर्णा :** जागतिक महिला दिनानिमित्ताने पोंभुर्णा येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा पोंभुर्णा महिला कृती समितीच्या वतीने भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. या बाईक रॅलीचे वैशिष्ट्य म्हणजे या रॅलीमध्ये तालुक्यातील सर्व जाती धर्म पक्ष सर्व शासकीय विभा गातील महिला सहभागी होत्या. दरवर्षी महिला मोठ्या संख्येने एकत्र येत महिला दिन साजरा करतात महिलांनी भूतकाळापासून आजपर्यंत केलेल्या संघर्षमय प्रवास आणि मिळवलेले यश याची आठवण करून देत ग्रामीण भागातील शेतकरी महिला कोणत्याही क्षेत्रात कमी नाही हा संदेश या बाईक रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

रॅलीचे विशेष आकर्षण म्हणजे माजी सभापती अलका आत्राम यांनी चालवलेली बुलेट महिलांसाठी नेहमीच नवे उपक्रम राबवण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे दिसून आले.

या रॅलीमध्ये अलका आत्राम माजी सभापती, सुलभा पिपरे नगराध्यक्ष, वैशाली बोलम वार, श्वेता बनकर, आकाशी गेडाम, पपीता पोलपोलवार, स्वाती खोब्रागडे, नेहा बुक्कावार, ज्योती बुक्कावार, शुभांगी कुतरमारे, वैशाली वासलवार, वैभवी श्रीकोंडावार, प्रणाली बोल मवार, जोशना मुरकुटे, मंगला माथनकर, विमल वाकुडकर, अश्विनी चलाक, सविता नैताम, माधुरी नैताम, प्रीती बच्चूवर, नेहा तोडसे, अवनी मानकर, ऋतुजा राठोड, सुनिता सुळे, आरती बगडे, संजीवनी कोकाटे, पूजा कणसे, संजीवनी खामनकर, भाग्यश्री खोब्रागडे, आचल नागोसे, पूनम शेंडे, रूपाली दिवसे, राजश्री जांभूळवार, कोमल संगिडवार, विना कुडमेथे यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने महिलांची उपस्थित होती.

## मनसेच्या कोंडकारूळ गट अध्यक्षपदी अभिषेक धावडे



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१०, अडूर (गुहागर) :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या २० व्या वर्धापनदिनाचे औचित्यपर गुहागर मनसेमध्ये नव नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून मनसे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष व जिल्हा परिषद सदस्य प्रमोद गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपाध्यक्ष विनोद जानवळकर, तालुका अध्यक्ष सुनील हळदणकर यांच्या वतीने उप तालुका अध्यक्ष प्रसाद विखारे यांच्या हस्ते अडूर आणि कोंडकारूळ गटात मनसेची नूतन पद जाहीर करण्यात आली असून कोंडकारूळ गट अध्यक्षपदी अभिषेक धावडे, अडूर शाखा अध्यक्षपदी साईराज झगडे, अडूर शाखा उपाअध्यक्ष पदी साहिल दहिवलकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत मनसेने आपले खाते उघडून यश संपादन केले असून येथील तरुण वर्ग राजसाहेब ठाकरे यांच्या विचारांवर प्रभावी होत मनसेच्या झेंड्याखाली आपला राजकीय प्रवास सुरु करत असल्याचे पाहायला मिळत आहे.


## नवीन बिना बौद्ध विहारात महिला दिन साजरा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयूवक संघ शाखा नवीन बिना यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन बिना बौद्ध विहारात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात थोर महापुरुष व महिलांच्या तैलचित्राला माल्यार्पण व बुद्ध वंदना घेऊन करण्यात आली. भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना अध्यक्ष डॉ. जितेंद्र सावजी तागडे यांनी तथागत बुद्धांनी सर्वप्रथम महिलांना बौद्ध संघात प्रवेश देवून समानतेची वागणूक दिली. तर भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात महिलांच्या अधिकारावर शिक्कामोर्तब केला असून मातृप्रधान समाज काळाजी गरज आहे, असे मत मांडले. आम्रपाली महिला मंडळ व कार्यक्रम अध्यक्ष कांता बागडे यांनी प्रत्येक महिलेने स्वावलंबी व स्वाभीमानी बनण्याचा निर्धार करावा असे आव्हान केले. तूळसा गौरकर, नंदा सोमकुंवर, मीना नरेश ढोके, मालवी नारनवरे यांनी गीत आणि कवितेच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले. याप्रंसगी आम्रपाली महिला मंडळांच्या अंजना मेश्राम, निर्मला चिमणकर, प्रभा लोखंडे, सत्यभामा वासनिक, बेबी वासनिक, राधा गौरकर, सरस्वती चौकांदे, कलावती खोब्रागडे, राधिका ऊके या जेष्ठ महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मिना ढोके, लता खोब्रागडे, सुनंदा लांजेवार, मनिषा ढोके, साजिता, डॉली, ओवी, चिकू, अक्षवी, तनिष्क सहित बहुसंख्येने नागरिक बाल-बालिका कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रास्ताविक मालवी नारनवरे, सुत्र संचालन सारिका तागडे व आभार कल्पना वासनिक यांनी मानले.

## मुक्रमाबाद ग्रामपंचायत वार्ड रचना जाहीर



**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.१०, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील सर्वात मोठी ग्राम पंचायत असलेल्या मुक्रमाबाद ग्राम पंचायतची वार्ड रचना रविवार (ता.८) सकाळी दहा वाजता ग्राम पंचायत सभागृहात वार्ड रचनेची प्रक्रिया पार पडली.वार्ड रचनेचे कार्यक्रमधिकारी म्हणून ग्राम महसूल अधिकारी. के.एम. कोडलवाड, यांची उपस्थिती होती. २०११ जनगणनेसुसार मुक्रमाबाद शहराची लोकसंख्या आठ हजार २९९ एवढी असून एकूण सहा वार्ड असून १७ सदस्य संख्या एवढी असून एका उमेदवाराला ४८८ एवढी लोकसंख्या येत असून वार्ड रचना ही रोटेशन (परिभ्रमण ) पध्दतीने करण्यात आली. असून आक्षेप तारीख दि.७ ते १३ एप्रिल पर्यंत घेण्याचे आवाहन ग्राम महसूल अधिकारी. के.एम. कोडलवाड, यांनी केले.

यावेळी सुभाषअप्पा बोधने, सुरेशदादा पंदिलवार, उप सरपंच सदाशिव बोयवार, ग्राम पंचायत सदस्य शंकरअप्पा खंकरे, बालाजी पसरगे, व्हाईस आफ मिडियाचे अध्यक्ष पत्रकार रज्जाक कुरेशी, दादाराव गुमडे, गौसखां पठाण, रज्जाक कुरेशी, बाबूराव गंदिगुडे, शशिकांत तेंलंग, सुर्यकांत भंगे, अवि पंदिलवार, तरुण व्यावसाईक व सामाजिक कार्यकर्ते अब्दुल पटेल, विनोद आपटे यांच्यासह शहरातील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# वंचित पत्रकारांना न्याय देण्यासाठी यंत्रणा सक्षम करण्यासाठी गरज : नीलम गोऱ्हे

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१०, मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेत नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेअंतर्गत पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित करून त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना करण्याबाबतचा मुद्दा विधानपरिषद सदस्य श्रीकांत भारतीय यांनी उपस्थित केला.

यावेळी पीठासीन अधिकारी म्हणून बोलताना विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी पत्रकारांना येणाऱ्या प्रत्यक्ष अडचणींकडे सरकारचे लक्ष वेधले. त्या म्हणाल्या की, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेचा लाभ अनेक पात्र पत्रकारांना मिळत नाही, कारण त्यांनी ज्या वर्तमानपत्रांमध्ये काम केले ते बंद पडलेले असते किंवा संबंधित संपादकांकडून प्रमाणपत्र मिळणे कठीण होते. अशा परिस्थितीत पात्र पत्रकार अपात्र ठरत असल्याचे अनेक प्रकरणे त्यांच्या निदर्शनास आली असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, अशा प्रकरणांमध्ये सत्यता पडताळण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान मंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या कामात निकषांबाबत तांत्रिक अडचणीतुन मार्ग काढण्यास यंत्रणा स्थापन करण्याची गरज आहे, जेणेकरून पत्रकारांना आपली



बाजू मांडण्यासाठी योग्य मंच उपलब्ध होईल. अनेक वृद्ध पत्रकार आजारी असूनही योजनांचा लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न करत राहतात, मात्र विद्यमान यंत्रणेतील मर्यादांमुळे त्यांना अडचणी येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

तसेच जिल्हा स्तरावर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला या संदर्भात अधिक अधिकार देऊन एक सक्षम आणि कायमस्वरूपी यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे, असेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री कार्यालयाकडे खाते असले तरी संबंधित मंत्र्यांनी या विषयाकडे लक्ष देऊन योग्य तो निर्णय घ्यावा, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सूचित केले.

यावर सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, या सूचनांचा गांभीर्याने विचार करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील, असे सांगितले.

# फिनिक्युलर रेल्वे प्रकल्प व एमजी रोडवर ब्लॉक कामासाठी 'एमएमआरडीए' त पाठपुरावा

**अक्षराज : चंद्रकात सुतार**

**दि.१०, माथेरान :** माथेरानच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या धोदाणी-माथेरान फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्प तसेच एमजी रोडवरील पेव्हर ब्लॉक कामासाठी नगराध्यक्ष व नगरसेवकांनी एमएमआरडीए कार्यालयात जाऊन पाठपुरावा केला.नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी व नगरसेवक मनोज खेडकर यांनी एमएमआरडीएचे मुख्य नगररचनाकार शंकर देशपांडे यांची भेट घेऊन धोदाणी-माथेरान फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पाच्या नियोजन संदर्भात चर्चा केली. यावेळी पर्यटनमंत्री शंभूराजे देसाई तसेच आमदार महेंद्र थोरवे यांनी एमएमआरडीए आयुक्तांना दिलेल्या पत्राची प्रत देशपांडे यांना देण्यात आली.

माथेरानसाठी फ्युनिक्युलर रेल्वे हा पर्यावरणपूरक व पर्यटन वृद्धीस चालना देणारा महत्त्वाचा पर्याय ठरणार असल्याने या प्रकल्पाच्या परवानग्या व प्रशासकीय



प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच नगराध्यक्ष व नगरसेवकांनी एमएमआरडीए आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांचीही भेट घेऊन लक्ष्मी हॉटेल गेट ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, एमजी रोड या मार्गावरील पेव्हर ब्लॉकच्या कामाबाबत सविस्तर चर्चा केली संबंधित कामाची फाईल सध्या आयुक्तांकडे मंजुरीसाठी प्रलंबित असून त्यांनी लवकरच मंजुरी देण्याचे मान्य केल्याची माहिती देण्यात आली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच निवडणुकांमुळे मागील तीन ते चार महिन्यापासून या कामावर कार्यवाही होऊ शकली नव्हती. मात्र आता लवकरच कामाला सुरुवात होऊन पावसाळ्यापूर्वी रस्ता पूर्ण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी फ्युनिक्युलर रेल्वे प्रकल्पासंदर्भात नगराध्यक्षांनी दिलेल्या निवेदनावर आयुक्तांनी शेरा लिहून पुढील कार्यवाहीसाठी मुख्य नगररचनाकारांना निर्देश दिल्याचेही सांगण्यात आले. माथेरानच्या विकासासाठी हे दोन्ही प्रकल्प लवकर मार्गी लागावेत यासाठी पुढेही सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे शिवसेना-भाजप युतीच्या सत्ताधारी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी व नगरसेवक मनोज खेडकर यांनी सांगितले.

# के. रामलू इंग्लिश स्कूलचा बहारदार सांस्कृतिक महोत्सव

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१०, कुंडलवाडी (नांदेड) :** शिक्षणासोबत संस्कार, संस्कृती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारी के. रामलू इंग्लिश मीडियम स्कूल ही संस्था आपल्या विविध उपक्रमांमुळे परिसरात वेगळी ओळख निर्माण करत आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय 'अंतरंग' सांस्कृतिक महोत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात पार पडला. नृत्य, नाट्य आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांच्या रंगतदार संगमाने उपस्थित रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक नृत्याविष्कारांनी, सामाजिक संदेश देणाऱ्या वास्तववादी नाटकांनी तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी वातावरण भारावून गेले. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त टाळ्यांचा कडकडाट मिळत होता.

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी




अध्यक्षस्थानी कुंडलवाडीच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार या होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी नगराध्यक्षा मैथिली कुलकर्णी, प्रतिष्ठित व्यक्ती साईनाथ उत्तरवार तसेच माजी नगराध्यक्ष भूम्मन्ना ठकूरवार यांची उपस्थिती लाभली.

तर पहिल्या दिवशी अध्यक्ष म्हणून पोलीस उपविभागीय अधिकारी दशरथ पाटील हे उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून एपीआय ज्ञानेश्वर शिंदे तसेच डॉ. नरेश बोधनकर यांनीही कार्यक्रमाला उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कुंडलवाडी नगरपरिषदेत कार्यरत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचाही गौरव करण्यात आला. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा हा उपक्रम विशेष ठरला.

यावेळी शाळेतील तसेच गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. नुकत्याच निवडून आलेल्या नगरसेवक व नगरसेविका यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. समाजातील घडामोडी जनतेपर्यंत पोहोचविणाऱ्या पत्रकार बांधवांचाही यावेळी सन्मान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी सादर केलेली सांस्कृतिक व धार्मिक नृत्ये तसेच महिला सक्षमीकरण व शिक्षणावर आधारित नाट्यप्रयोग प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरले. या सादरीकरणांनी कार्यक्रमाला अधिकच रंगत आणली.

या दोन दिवसीय 'अंतरंग' महोत्सवामुळे संपूर्ण परिसरात सांस्कृतिक उत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक तथा अध्यक्ष सायरेड्डी ठक्कुरवार, सौ. रमा ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमकर, प्राचार्य संभाजी जाधव उपप्राचार्यम सपना मॅडम तसेच सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन दत्ता हमंद यांनी केले. आभार प्रदर्शन सायरेडी ठकूरवार यांनी केले व कार्यक्रमाची सांगता पसायदान तसेच राष्ट्रगीताने झाली.


# महिलांच्या सक्षमीकरणासाठी योजनांची श्वेतपत्रिका काढावी : आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१०, चंद्रपूर :** आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त महाराष्ट्र विधानसभेत मांडण्यात आलेल्या ठरावावर बोलताना आ. सुधीर मुनगंटीवार यांनी महिलांच्या सक्षमीकरणासंदर्भात राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा सखोल आढावा घेत, महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांवर श्वेतपत्रिका काढण्याची मागणी केली. या चर्चेला उत्तर देताना महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी मुनगंटीवार यांनी मांडलेल्या सूचनांवर सकारात्मक भूमिका घेत अनेक बाबींची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन दिले.

चर्चेत बोलताना आ. मुनगंटीवार म्हणाले की, महाराष्ट्रात सुमारे साडेसहा कोटी महिला आहेत. आपल्या संस्कृतीत महिलांचे स्थान अत्यंत उच्च मानले गेले आहे. छत्रपती शिवाजी महाराज महिलांचे स्थान देवाच्या देव्हाऱ्यात देवासोबत असल्याचे सांगत असत. त्यामुळे महिलांचा सन्मान ही केवळ परंपरा नसून आपल्या संस्कृतीचा मूलाधार आहे. ते पुढे म्हणाले की, देशात महिला धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. मात्र महिलांसाठी योजना राबविताना त्या महिलांना खऱ्या अर्थाने आर्थिक स्वातंत्र्य देतात का, याचे आत्मचिंतन करणे गरजेचे आहे. केंद्र व राज्य शासनाच्या महिलांसाठीच्या योजनांचा एकत्रित आढावा घेऊन श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी, अशी मागणी त्यांनी केली.

राज्यात वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांविषयी चिंता व्यक्त करत त्यांनी सांगितले की, सोशल मीडियावरील छळामुळे अनेक तरुणींना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर सर्व महिला आमदारांनी एकत्र येऊन पंतप्रधानांची भेट घेऊन सायबर गुन्ह्यांविरोधात कठोर कायदे करण्याची मागणी करावी, असेही त्यांनी



सुचविले. महिलांच्या सहनशक्तीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, भारतात पुरुषांचे सरासरी आयुर्मान सुमारे ७१ वर्षे, तर महिलांचे ७४ वर्षे आहे. शेतकरी आत्महत्यांच्या संदर्भातही बहुतेकदा पुरुष आत्महत्या करतात; परंतु स्त्री शेतकरी संघर्ष करून परिस्थितीला तोंड देते, असे त्यांनी नमूद केले. पायाभूत सुविधांवर कोट्यवधी रुपये खर्च होत असताना मजूर सहकारी संस्थांना ३० लाखांपर्यंतची कामे देण्याचा नियम आहे, त्याच धर्तीवर महिला सहकारी संस्थांनाही ही संधी देण्याचा शासन निर्णय दोन दिवसांत घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. या संदर्भात मागील अधिवेशनात आश्वासन देण्यात आले असले तरी त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले.

राज्यातील साडेतीन शक्तीपीठांच्या परिसरात महिलांसाठी औद्योगिक क्षेत्र विकसित करावे, अशी अभिनव संकल्पना मांडताना त्यांनी चंद्रपूर येथील देवी महाकाली मंदिर परिसरातही महिलांसाठी औद्योगिक क्षेत्र निर्माण करण्याची मागणी केली.

महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी तो केवळ संख्यात्मक नव्हे तर गुणात्मकही असावा, यासाठी महिला लोकप्रतिनिधींना कायद्याचे व प्रशासकीय प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय महिला विषयक कायदे व योजनांचा अभ्यास करण्यासाठी महिला आमदारांची स्वतंत्र समिती गठित करावी, अशीही मागणी त्यांनी केली.

अक्षराज



# सावनेर तालुक्यात पशु रुग्णवाहिकेचा गैरवापर?

## प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी – दद्दू गणवीर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** सावनेर तालुक्यातील शेतकरी, प्राणीमित्र आणि नागरिकांच्या सोयीसाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री सहायता निधीतून पशु रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली आहे. जखमी, आजारी किंवा अपघातग्रस्त प्राण्यांना तात्काळ मदत मिळावी, त्यांना प्राथमिक उपचार देऊन सुरक्षितपणे पशुवैद्यकीय रुग्णालयात पोहोचवावे हा या रुग्णवाहिकेचा मुख्य उद्देश आहे. मात्र प्रत्यक्षात सावनेर तालुक्यात या पशु रुग्णवाहिकेचा योग्य वापर होत नसल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते व वर्ल्ड फॉर नेचर सामाजिक संस्थाचे नागपूर शहर जिल्हाध्यक्ष दद्दू राजेंद्र गणवीर यांनी केला आहे.

माहितीनुसार ज्या गावांमध्ये पशु उपचार केंद्र उपलब्ध नाही अशा ठिकाणी औषधे पोहोचविणे किंवा इतर कामांसाठी या पशु रुग्णवाहिकेचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे जखमी किंवा अपघातग्रस्त प्राण्यांना वेळेवर मदत मिळत नाही. पशु रुग्णवाहिकेचा हा वापर तिच्या मूळ उद्देशाच्या विरोधात असून शासनाच्या नियमांचे उल्लंघन असल्याचेही गणवीर यांनी म्हटले आहे.




सावनेर तालुक्यात सर्जन डॉक्टर तसेच शस्त्रक्रियेच्या सुविधा अपुऱ्या असल्यामुळे अनेक वेळा गंभीर जखमी प्राण्यांना नागपूर येथील पशुवैद्यकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवावे लागते. अशा वेळी पशु रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यामुळे शेतकरी व प्राणीमित्रांना खासगी वाहनाचा वापर करावा लागतो. त्यासाठी हजारो रुपयांचा खर्च करावा लागतो.

या परिस्थितीमुळे बेवारस प्राणी तसेच शेतकऱ्यांच्या जनावरांचे मृत्यू होत असून शेतकरी वर्गाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचीही खंत व्यक्त करण्यात आली आहे.

जर एखाद्या गावात पशु उपचार केंद्र नसेल, तर त्या ठिकाणी स्वतंत्र पशु उपचार केंद्र स्थापन करणे हे शासनाचे धोरण आहे. मात्र त्याऐवजी पशु रुग्णवाहिकेचा वापर दवाखान्याच्या कामासाठी करणे योग्य नसल्याचेही गणवीर यांनी स्पष्ट केले आहे.

या संदर्भात दद्दू गणवीर यांनी संबंधित प्रशासनाला लेखी निवेदन देत पशुसंवर्धन विभागाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी केली आहे. तसेच या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन पशुसंवर्धन विभाग आयुक्त नागपूर, उपायुक्त पशुसंवर्धन विभाग नागपूर, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव (पशुसंवर्धन विभाग), जिल्हाधिकारी नागपूर तसेच पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांना देखील अधिकृत ई-मेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

प्रशासनाने या प्रकरणाकडे तातडीने लक्ष देऊन पशु रुग्णवाहिकेचा वापर केवळ जखमी व आजारी प्राण्यांच्या रेस्क्यूसाठीच करण्यात यावा तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी गणवीर यांनी केली आहे. अन्यथा शेतकरी, प्राणीमित्र आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा ही त्यांनी दिला आहे.

# खंडाळा भूषण व आदर्श माता सन्मान पुरस्कार सोहळा संपन्न



**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१०, खंडाळा (सातारा) :** जागतिक महिला दिनानिमित्त कृष्णा हॉस्पिटल व वैद्यकीय संशोधन केंद्र, अतुलबाबा भोसले युवा प्रतिष्ठान कराड यांच्यासह खंडाळा विभाग शिक्षण समिती आणि मातोश्री सुशिला शंकरराव गाढवे प्रतिष्ठान खंडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने राजेंद्र विद्यालय शैक्षणिक संकुलात मोफत सर्वरोग तपासणी शिबीर, महिला दिन व खंडाळा भूषण पुरस्कार प्रदान सोहळा शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकताच संपन्न झाला.

समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून राजेंद्र विद्यालयाचे माजी विद्यार्थी विद्यमान शस्त्रक्रिया विभाग अधिष्ठाता नवले हॉस्पिटल व मेडिकल कॉलेज, पुणे डॉ.संदीप जाधव आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी दत्तात्रय खंडागळे व कृष्णकुमार (अभयकुमार) जाधव, डॉ. प्रियांका चौधरी सातपुते यांची उपस्थिती होती. प्रारंभी सर्व मान्यवरांचा खंडाळा विभाग शिक्षण समिती वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक करताना सचिव संजीव(अनिरुद्ध)गाढवे म्हणाले-०२ मार्च २०१८ रोजी मातोश्री सुशिला माईंच्या अकाली निधनाने आम्ही पोरके झालो.

माईंच्या स्मृती प्रज्वलीत ठेवण्यासाठी सर्वरोग निदान आरोग्य शिबीर अखंडित चालू आहे. यासोबत कर्तृत्ववान महिला सन्मान, प्रशांत माधवराव खंडागळे यांच्या संकल्पनेतून आदर्श माता सन्मान तसेच खंडाळा भूषण पुरस्कार वितरण सोहळा यासोबत गरजू होतकरू आणि गुणवत्ताधारक मुलींना शिष्यवृत्ती वाटप असे समारंभ शिक्षण महर्षी शंकरराव गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येतात. यावर्षी कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, ग्रामीण रुग्णालय खंडाळा, प्रा.आ. केंद्र,अहिरे सहकार्याने आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे. याचा खंडाळा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करत आहे,

यावेळी डॉ.प्रियांका चौधरी सातपुते यांचा उपप्राचार्या अरुंधती गाढवे यांच्याशी हस्ते कर्तृत्ववान महिला सन्मान पुरस्काराने सन्मान करण्यात आला. आदर्श माता सन्मान सोहळ्यात खंडाळा व पंचक्रोशीतील कौटुंबिक जबाबदारी सांभाळत आपल्या पाल्यांना उच्चपदस्थ आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्यासाठी क्षमतावान बनविणाऱ्या मातांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

खंडाळा गावाच्या जडणघडणीत अतुलनीय योगदान देणारे आणि ज्येष्ठ असूनही सक्रिय असणारे संपतराव मारुती खंडागळे तात्या यांचा खंडाळा भूषण पुरस्कार व सुविद्य पत्नी सिंधू खंडागळे यांचा आदर्श माता पुरस्काराने यथोचित गौरव करण्यात आला.

यासोबत डॉ.संदीप जाधव,निवृत्त पोलीस अधिकारी दत्तात्रय खंडागळे, कृष्णकुमार जाधव आणि पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांचा खंडाळा विभाग शिक्षण समिती भूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला.यावेळी सत्कारमूर्ती शारदा खंडागळे यांच्या वतीने कन्या सरोजिनी खंडागळे यांनी मनोगत व्यक्त केले.समारंभाचे नियोजन आणि संयोजनासाठी कार्यालयीन अधीक्षक संतोष गाढवे, कर्मचारी प्रल्हाद राऊत,दिलीप गाढवे,उपशिक्षक सोमनाथ गर्जे, गोरखनाथ भोसले, ग्रंथपाल हणमंत यादव आदींनी अथक परिश्रम घेतले. प्राचार्य, उपप्राचार्य, उपमुख्याध्यापक,राजेंद्र विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालय,खंडाळा इंग्लिश मिडीयम स्कुल,सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालय, खंडाळा सर्व शिक्षक, प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

समारंभाचे सूत्रसंचालन प्रा.मनोज यादव यांनी केले.आभार सुशिला शंकरराव गाढवे महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.प्रतिभा पाटणे यांनी आभार मानले.

# पालम पंचायत समिती सभापती पदी रेवता ढोले; उपसभापती पदी सुरेखा बरडे यांची बिनविरोध निवड

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१०, पालम (परभणी) :** पालम पंचायत समिती सभापती व उपसभापती पदाच्या निवडीसाठी दि.१० मार्च रोजी पंचायत समिती सभागृहात विशेष बैठकीचे आयोजन केले होते यावेळी रेवता लक्ष्मण ढोले यांची सभापतीपदी तर सुरेखा बालाजी बरडे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.

निवड प्रक्रिये दरम्यान पंचायत समितीच्या एकूण ८ सदस्यांपैकी ७ सदस्य या बैठकीस उपस्थित होते.सभापती पदासाठी रेवता लक्ष्मण ढोले यांचा तर उपसभापती पदासाठी सुरेखा बालाजी बरडे यांचा प्रत्येकी एकच उमेदवारी अर्ज दाखल झाला होता. उमेदवारी अर्जाची छाननी आणि माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर इतर कोणताही अर्ज दाखल नसल्याने दोन्ही पदांवर बिनविरोध निवड जाहीर केली.

या विशेष सभेसाठी पिठासीन अधिकारी म्हणून विशेष भू संपादन अधिकारी विद्या केंद्रे यांच्या सह तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे, गटविकास अधिकारी उदय शिसोदे, यांनी काम पाहिले. निवड जाहीर होताच उपस्थित सदस्यांनी नवनिर्वाचित



सभापती व उपसभापती यांचे स्वागत केले. पंचायत समितीच्या विकासकामांना गती देऊन तसेच ग्रामीण भागातील विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करू, असे मत नवनिर्वाचित सभापती, उपसभापती सर्व सदस्य यांनी व्यक्त केले. या निवड प्रक्रिये दरम्यान पोलीस निरीक्षक शेषराव खटाने यांनी पंचायत समिती परिसरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# महिला दिनाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी जाखड यांचा श्रमजीवी संघटनेतर्फे सन्मान

**अक्षराज : विनायक भोईर**

**दि.१०, वसई :** श्रमजीवी संघटने तर्फे उसगाव येथे जागतिक महिला दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या महिला मेळाव्यात पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड यांचा सन्मान करण्यात येणार होता. मात्र काही अपरिहार्य कारणास्तव त्या मेळाव्यास उपस्थित राहू शकल्या नाहीत. त्यामुळे श्रमजीवी संघटनेचे महिला पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी पालघर जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन त्यांचा सन्मान करून महिला मेळाव्याच्या शुभेच्छा दिल्या. दरम्यान श्रमजीवी संघटना ही वंचित, कामगार, आदिवासी व सर्वसामान्य घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने कार्य करणारी सामाजिक चळवळ असून शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि न्याय हक्क या क्षेत्रांत सक्रियपणे कार्य करत आहे. जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड या प्रशासकीय सेवेत कर्तव्यनिष्ठा, पारदर्शकता आणि संवेदनशीलतेने कार्य करत असून शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करताना त्यांनी सर्वसामान्य नागरिक, आदिवासी व वंचित घटकांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन प्रशासन अधिक लोकाभिमुख केले आहे. तसेच त्यांच्या ठाम व सकारात्मक नेतृत्वामुळे महिला सक्षमीकरण, कायदा-सुव्यवस्था, महसूल प्रशासन आणि सामाजिक न्याय या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी झाली आहे. महिलांना आत्मविश्वासाने पुढे येण्यासाठी प्रेरणा देणारे त्यांचे कार्य हे समाजातील परिवर्तनाचे भक्कम पाऊल आहे. या प्रसंगी श्रमजीवी संघटनेच्या महिला नेतृत्वाच्या हस्ते पालघर जिल्हाधिकारी तथा दंडाधिकारी इंदुराणी जाखड यांचा कर्तव्यावर असताना पारंपरिक पद्धतीने सन्मान करण्यात आला. त्यांना चौरंगावर सन्मानाने उभे करून शाल, श्रीफळ, संघटनेचे सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करत श्रमजीवी संघटनेतर्फे त्यांना जागतिक महिला दिन विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. या भेटीदरम्यान महिला सक्षमीकरण, संघटनात्मक कार्य आणि समाजातील महिलांच्या प्रश्नांवरही सकारात्मक चर्चा झाली. यावेळी श्रमजीवी संघटनेचे सरचिटणीस विजय जाधव, संघटक सचिव (प्रशिक्षण) सीता घाटाळ, पालघर जिल्हाध्यक्ष सुरेश रेंजड, पालघर जिल्हाधिकारी महिला प्रमुख रेखा पऱ्हाड, सुरक्षा रायात तलासरी तालुका अध्यक्ष, हिना वनगा पालघर तालुका सचिव, आशा तुंबडे उपाध्यक्ष वसई शहर, लक्ष्मी वाघ वसई ग्रामीण महिला प्रमुख, सोनु मुकणे वसई शहर प्रमुख, पालघर तालुका अध्यक्ष उल्हास पाटील तसेच विलास मोरघे श्रमजीवी कामगार संघटना कार्यलय प्रमुख हे उपस्थित होते.

# थोडक्यात

## जागतिक किडनी सप्ताहानिमित्त घाटकोपर स्थानकावर जनजागृती शिबिर



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१०, घाटकोपर (मुंबई) :** जागतिक किडनी सप्ताहाच्या निमित्ताने घाटकोपर रेल्वे स्थानक परिसरात किडनी आरोग्य जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ.सिद्धार्थ लखानी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि इंडियन मेडिकल असोसिएशन एन इ बी एस शाखेच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन डॉ.देवांशी लखानी, इंडियन मेडिकल असोसिएशन एन इ बी एस शाखेचे अध्यक्ष डॉ.हरीश पांचाल आणि डॉ.दर्शना दोशी यांनी केले. सर्वसामान्य नागरिकांमध्ये किडनीच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे, किडनीच्या आजाराचे लवकर निदान आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून देणे हा या शिबिराचा मुख्य उद्देश होता. या शिबिरामध्ये घाटकोपर स्थानकावर येणाऱ्या प्रवाशांना तसेच स्थानिक नागरिकांना किडनीचे आरोग्य कसे जपावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.उच्च रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात ठेवणे, पुरेसे पाणी पिणे, गरज नसताना वेदनाशामक औषधांचा वापर टाळणे तसेच नियमित आरोग्य तपासणी करून घेणे या गोष्टी किडनीच्या आजारांपासून बचावासाठी अत्यंत महत्त्वाच्या असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच किडनीच्या आजारांचे वेळेत निदान झाल्यास आणि जीवनशैलीत योग्य बदल केल्यास दीर्घकालीन किडनी विकारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी करता येते, असा संदेश ही या शिबिरातून देण्यात आला. अशा प्रकारच्या जनजागृती उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढून निरोगी जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहन मिळते, असे मत यावेळी डॉ. सिद्धार्थ लखानी यांनी केले.

## महाराष्ट्र विद्यालय, खापरखेडा येथील NMMS परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१०, नागपूर :** महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथील एकुण सहभागी २१ विद्यार्थ्यांपैकी १० विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMS) परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेत. विद्यार्थ्यांच्या सत्कारा प्रसंगी शाळेचे उपमुख्याध्यापक श्री.लिखार, पर्यवेक्षक माहूरतळे, शिक्षक प्रतिनिधी पुल्लिवार, ज्येष्ठ शिक्षिका नांदेकर, श्री.शिंदे तसेच सर्व शिक्षकवृंद मंचावर उपस्थित होते.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दूर्बल घटक (NMMS) शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यात आपल्या शाळेतील १० प्रज्ञावंत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. ही परीक्षा इयत्ता ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी आयोजित करण्यात येते. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता ९ ते १२ पर्यंत दरवर्षी १२ हजार रुपये असे एकुण ४८ हजेरी रूपयांचे प्रोत्साहन पर अनुदान केंद्र शासनाच्या वतीने थेट त्यांच्या बँक खात्यात (DBT) जमा केले जाणार आहे. या योजनेमुळे हुशार विद्यार्थ्यांचे १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण होण्यास मोठी मदत होते. ज्या विद्यार्थ्यांनी विशेष कौतुकास्पद कामगिरी केली असून मुख्याध्यापक श्री.वडस्कर यांनी त्यांच्या यशाबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## कुंडलवाडी व परिसरातील शेतकऱ्यांचा पीक विमा तातडीने द्या – नगराध्यक्षा

**अक्षराज : दत्ता हमंद**



**दि.१०, कुंडलवाडी (नांदेड) :** खरीप हंगाम २०२५-२६ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे कुंडलवाडी व परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सततच्या मुसळधार पावसामुळे शेतामध्ये पाणी साचून उभी पिके नष्ट झाली असून अनेक शेतकऱ्यांचे संपूर्ण उत्पादन हातचे गेले आहे. त्यामुळे शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. कुंडलवाडी व परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगाम २०२५-२६ साठी पीक विमा भरलेला आहे. संबंधित विभागामार्फत पंचनामे ही करण्यात आलेले आहेत. मात्र आजतागायत अनेक शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर मंजूर झालेल्या पीक विम्याची रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर कुंडलवाडी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार नगरसेवक रमेश ईरलावार व संजय खुळगे यांनी नांदेड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन कुंडलवाडी तसेच परिसर येथील शेतकऱ्यांच्या मंजूर पीक विम्याबाबत तातडीने चौकशी करून संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर विम्याची रक्कम लवकरात लवकर जमा करण्याची मागणी केली आहे. शेतकरी हा देशाचा कणा असून नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारा पीक विमा हा शेतकऱ्यांसाठी मोठा आधार असल्याचे ही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

## २ री ते ८ वी संकलित मूल्यमापन चाचणी - २ वेळापत्रकात बदलाची मागणी

**अक्षराज : नितीन पाटील**

**दि.१० चिमूर (चंद्रपूर) :** इयत्ता दुसरी ते आठवी अंतर्गत संकलित मूल्यमापन चाचणी दोन पॅट-३ वेळापत्रकात बदल करून सर्व परीक्षा ११ एप्रिल पर्यंत घेण्याची मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे. राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता २ री ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी नियतकालिक मूल्यांकन चाचण्यांचे (पॅट) आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार संकलित मूल्यमापन चाचणी दोनचे वेळापत्रक सध्या निर्गमित केले आहे. संकलित चाचणी - दोन २२ एप्रिल पर्यंत घेण्याचे आदेश आहेत. २२ एप्रिल २०२५ ला शेवटचा पेपर ठेवला आहे. सध्या मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात उन्हाचा पारा वाढला आहे. कडक उन्ह, पिण्याच्या पाण्याची टंचाई या सर्व गोष्टींचा विचार करता एवढ्या उशिरापर्यंत परीक्षा ठेवणे योग्य होणार नाही. या सर्व बाबींचा विचार करुन परीक्षा ११ एप्रिल पूर्वी घेण्यात याव्यात अशी मागणी शिक्षक भारती संघटनेने केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक भारती नागपूर विभागीय अध्यक्ष सुरेश डांगे यांनी दिली आहे.